ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *



# भारतीय राज्यघटनेतील आदिवासी कल्याणासंदर्भात घटनात्मक तरतूदी—एक विश्लेषणात्मक आढावा

**प्रा. डॉ. देबडे संजय मारूतराव**
*सहा. प्राध्यापक लोक प्रशासन विभाग, देगलूर कॉलेज, देगलूर*
*मो. नं. ९९२२७२४२९२ Email Id: smdebde@gmail.com*
**प्रा. डॉ. विजय लक्ष्मण तरोडे**
*सहाय्यक प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.*

देशाच्या प्रशासनाची रूपरेषा त्या देशाच्या राज्यघटनेनेच ठरवून दिलेली असते. जेथे जेथे घटनात्मक शासन असते तेथे तेथे राज्याचे प्रशासन घटनात्मक तरतुदीनुसारच चालविले जाते. भारतीय राज्यघटनेतील महत्त्वाच्या तरतुदींची दखल आपणास घ्यावी लागते. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात मुलभूत हक्कांच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान हक्क देण्यात आले. १४ व्या कलमानुसार कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान आहेत आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण देण्यात आले. १५ व्या कलमानुसार जात, धर्म, लिंग रहित शैक्षणिक पात्रता असणाऱ्या स्त्री पुरूषास शासनात कोणतेही पद धारण करता येईल असे नमूद करण्यात आले. स्वातंत्र्याच्या हक्कामध्ये प्रत्येक नागरिकाला भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्यात आले आहे. भाषण स्वातंत्र्यामुळे विचारांची देवाण—घेवाण होते. भारतात पूर्वीपासून वेठबिगारी सारख्या प्रथा होत्या त्यामुळे मागासलेल्या जाती जमातीच्या लोकांचे आर्थिक व सामाजिक शोषण होत असे. अशा प्रथा बंद करण्यासाठी मानवी देहाच्या खरेदी—विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही तसेच कोणाकडूनही मोफत आणि सक्तीने काम करवून घेता येणार नाही. अशी कलम २३ मध्ये तरतूद करण्यात आली. भारतीय राज्यघटनेनी भारतात धर्मातीत राज्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट मान्य केले असून कलम २५ अन्वये धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार सर्व व्यक्तींना दिलेला आहे. या अधिकारानुसार प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माचे आचरण, पालन व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. भारतात विविध स्वरूपाचे अल्पसंख्यांकाचे गट व समूह आहेत. त्यांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी घटनेनी कलम २९ नुसार कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची भाषा, लिपी किंवा संस्कृती जतन करता येते.

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणासंबंधिची मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आलेली असून ३८ व्या कलमात ज्या समाज व्यवस्थेत सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित केला जाईल, त्या समाज व्यवस्थेचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचा प्रयत्न राज्याकडून केला जाईल असे नमूद करण्यात आले. कलम ४६ मध्ये



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S Dist.Nanded



समाजातील दुर्बल घटक आणि विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या शिक्षणाची आणि त्यांच्या आर्थिक हितसंबंधाची राज्य विशेष काळजी घेईल. तसेच सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांना सरकार संरक्षण देईल.

स्थानिक शासन संस्था लोकशाही विकेंद्रिकरणासाठी महत्त्वपूर्ण यंत्रणा आहेत. राज्यघटनेच्या कलम २४३ (घ) नुसार पंचायतीराज संस्थांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवल्या जातील तसेच सर्व पातळीवरील पंचायतराज संस्था मधील सभाध्यक्षांची पदेही अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव ठेवली जातील. नागरी भागातील स्थानिक समस्या सोडविण्यासाठी नागरी स्थानिक स्वशासन संस्था निर्माण केल्या जातात. नगरपालिकेत देखील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी कलम २४३ (न) नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा राखीव असतात तसेच नगरपालिकेतील सभाध्यक्षांची पदे देखील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवली जातात.

लोकसभा हे भारतीय संसदेचे प्रथम व कनिष्ठ सभागृह असून लोकसभेत जनतेनी निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना प्रतिनिधीत्व देण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील कलम ३३० नुसार त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवल्या जातात. कलम ३३२ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्यानुसार विधानसभेतील जागा राखून ठेवण्यात येतील.

संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराच्या संबंधातील सेवामध्ये व पदावर नियुक्ती करताना कलम ३३५ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यामधील व्यक्तींचे हक्क प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशा रितीने विचारात घेतले जातील. अनुसूचित जमातीचे भारतीय समाज व्यवस्थेतील स्थान लक्षात घेऊन त्यांच्या विकासाकडे जास्तीत जास्त लक्ष देता यावे आणि त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी, त्यांच्या विकासासाठी आवश्यक शिफारशी केल्या जाव्यात यासाठी राज्यघटनेच्या कलम ३३८(क) नुसार एका अनुसूचित जमाती राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली. कलम ३३९ नुसार अनुसूचित क्षेत्राचे प्रशासन व अनुसूचित जमाती बाबतचे कल्याणकारी काम या बाबत अहवाल देण्यासाठी राष्ट्रपती एक आयोग नेमू शकतात. तसेच कलम ३४२ नुसार एखाद्या जमातीला अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याचा किंवा यादीतून कमी करण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतीला आहे.

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



आदिवासीच्या हित संवर्धनासंबंधाने ज्या महत्त्वाच्या तरतुदी वाटल्या त्याचा उल्लेख वर करण्यात आला आहे, या तरतुदीचे अवलोकन केल्यास आपल्या घटनेमध्ये लोकांच्या हितांची व विशेष करून दुर्बल घटक उदा. आदिवासींच्या हितांची पुरेशी काळजी घेण्यात आली आहे.

**संदर्भ :**


१) देवगांवकर एस.जी., आदिवासी विकास प्रशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.
२) भोगे कृष्णा, भारतीय राज्यघटना, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.
३) पाटील बी.बी., भारतीय शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००३.
४) राठोड मधू, भारतीय राजनीतिक व्यवस्था, आविष्कार पब्लिशर्स, जयपूर, २००२.
५) पाटील व्ही.बी., भारतीय राज्य व्यवस्था, के.सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००८.
६) डॉ.विळेगावे, डॉ.यमलवाड, भारतीय प्रशासन, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड, २०११.
७) देशमुख अलका, भारतीय शासन आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर .
८) कश्यप सुभाष, हमारा संविधान, नेशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नई दिल्ली, २००६.
९) भारताचे संविधान, संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, २००६.
१०) विभुते भालबा, भारताचे संविधान, मनोविकास प्रकाशन, मुंबई, १९९९.


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded